आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक  बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
०६ मे २०२५ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- पहलगाम हल्ल्यानंतर युद्धसदृश स्थितीची शक्यता लक्षात घेऊन देशात २४४ ठिकाणी युद्धस्थितीतला नागरी संरक्षण सराव करण्यात येणार

- भारताची अर्थव्यवस्था यंदा जपानला मागे टाकून जगात चौथ्या क्रमांकावर जाण्याचा आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचा अंदाज

- राज्यातल्या विविध तीर्थक्षेत्रांच्या विकासाकरता ५ हजार ५३० कोटी रुपये निधीला राज्यमंत्रीमंडळाची मंजुरी

- जातनिहाय जनगणनेच्या अंमलबजावणीविषयी काँग्रेसच्या विविध सूचना

**आणि**

- सातव्या खेलो इंडिया क्रीडा स्पर्धेत जलतरणात आदिती हेगडे हिनं सुवर्णपदक पटकावत महाराष्ट्रासाठी पदकांचं खातं उघडलं

**<><><><><>**

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यात तणावाच्या पार्श्वभूमीवर युद्धसदृश स्थिती उद्भवण्याची शक्यता गृहीत धरून देशभरातल्या २४४ नागरी संरक्षण प्रभागांमधे युद्धस्थितीतला नागरी संरक्षण सराव होणार आहे. केंद्रीय गृह सचिव गोविंद मोहन आज त्यासंदर्भात सर्व राज्यांच्या मुख्य सचिवांची बैठक घेत आहेत. नागरी संरक्षण विभागाचे महासंचालक, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाचे महासंचालक आणि इतर संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी बैठकीला उपस्थित आहेत.

राज्यात मुंबई, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, छत्रपती संभाजीनगर आणि नाशिक या जिल्ह्यांमधे निवडक ठिकाणी हा सराव होईल. उरण, तारापूर,

रोहा, धाटाव, नागोठणे, थळ- वायशेत, मनमाड, सिन्नर, भुसावळ, आणि पिंपरी चिंचवड या ठिकाणांचा त्यात समावेश आहे. नागरी संरक्षण संघटना, राष्ट्रीय छात्र सेना, तसंच राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनाही सरावात सहभागी करुन घेतलं जाईल. हल्ला झाल्यास करण्याच्या हालचालींविषयी नागरिकांना, विशेषतः विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देणं, तसंच धोक्याचा इशारा देणारी यंत्रणा, नियंत्रण कक्ष, इत्यादींची सज्जता तपासून पाहणे हा या सरावाचा भाग आहे. दरम्यान पहलगाम हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित दोवाल यांची आज भेट झाली. प्रधानमंत्र्यांच्या निवासस्थानी झालेल्या या बैठकीत सुमारे ४० मिनिटं  महत्त्वपूर्ण बाबींवर चर्चा झाली.

**<><><><><>**

भारताच्या जीडीपीमधे चालू वर्षात वाढ होऊन तो ४ हजार १८७ अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचण्याची शक्यता असल्याचं आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या अहवालात म्हटलं आहे.  भारतीय अर्थव्यवस्था जपानला मागे टाकून जगात चौथ्या क्रमांकावर पोहोचण्याची शक्यता नाणेनिधीने वर्तवली आहे. जगातली सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था हे स्थान भारतानं यंदाही राखलं असून आगामी २ वर्षात वाढीचा दर ६ दशांश टक्के राहील. २०२८मधे भारताचा जीडीपी ५ हजार ५८४ अब्ज डॉलर्सहून जास्त होण्याची शक्यता असून तेव्हा जर्मनीला मागे टाकून भारतीय अर्थव्यवस्था तिसऱ्या क्रमांकावर पोहोचेल. जर्मनीचा वाढीचा दर यंदा शून्य टक्के राहील तर पुढच्या वर्षी २०२६मधे तो ९ दशांश टक्के राहील असा अंदाज आहे. जगातली सर्वात मोठी अर्थव्यवस्था अमेरिकेची असून तिथं जीडीपी ३० हजार ५०७ पर्यंत पोहोचला आहे. दुसऱ्या क्रमांकावर चीन असून त्यांचा जीडीपी १९ हजार २३१ अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त आहे.

**<><><><><>**

यूपीआय क्यूआर कोडने २०२४-२५ या आर्थिक वर्षात डिजिटल पेमेंट इन्फ्रास्ट्रक्चरमध्ये साडे ९१ टक्क्यांची वाढ नोंदविली आहे. यूपीआय क्यूआर कोडमध्ये वाढ झाल्यानं क्रेडिट कार्ड व्यवहारांचा विकासदर ७ पूर्णांक ९४ शतांश टक्क्यांवर आला आहे. मार्चमध्ये यूपीआय व्यवहारांमध्ये २४ लाख ७७ हजार कोटी रुपयांची उलाढाल झाली आहे. आर्थिक वर्ष २०२४ मध्ये देशात पाचपैकी चार व्यवहार यूपीआय वापरुन करण्यात आले आहेत.

**<><><><><>**

अहिल्यानगर जिल्ह्यातल्या चौंडी इथं आज मंत्रिमंडळाची बैठक झाली. राज्यातल्या विविध तीर्थक्षेत्रांच्या विकासाकरता ५ हजार ५३० कोटी रुपये निधीला मंजुरी दिल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी बैठकीनंतर वार्ताहर परिषदेत सांगितलं. यात अष्टविनायक गणपतींच्या जिर्णोद्धारासाठी १४७ कोटी, तुळजाभवानी मंदिर विकास आराखड्यासाठी १ हजार ८६५ कोटी, जोतिबा मंदिर विकास आराखड्यासाठी २५९ कोटी, त्र्यंबकेश्वर विकास आराखड्यासाठी २७५ कोटी, महालक्ष्मी मंदिर १ हजार ४४५ कोटी आणि माहूर गडासाठी ८२९ कोटी मंजूर करण्यात आले आहेत. अहिल्यादेवींनी जे कार्य केलं होतं तेच राज्य सरकार करत आहे, असं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

यशवंत विद्यार्थी योजने अंतर्गत धनगर समाजातल्या दहा हजार विद्यार्थ्यांना नामांकित शाळांमधे प्रवेश दिला जाणार, विभागस्तरावर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर वसतिगृह योजना सुरू करणार, मुलींसाठी आयटीआय स्थापन करणार अशी घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली. अहिल्यानगर जिल्ह्यात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय उभारण्याची तसंच जिल्ह्यात दिवाणी न्यायालय स्थापन करायला मान्यता दिल्याचंही त्यांनी सांगितलं. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मृतिस्थळाचं जतन आणि संवर्धन करण्यासाठी ६८१ कोटी रुपयांच्या आराखड्याला मंजुरीही देण्यात आली आहे.

**<><><><><>**

न्यायव्यवस्थेत पारदर्शकता कायम राखण्याच्या उद्देशाने सर्वोच्च न्यायालयाने सरन्यायाधीशांसह सर्व न्यायाधीशांच्या मालमत्तेचा तपशील जाहीर केला आहे. यासह सर्वोच्च न्यायालय आणि देशभरातल्या उच्च न्यायालयातल्या न्यायाधीशांच्या नियुक्तीची संपूर्ण प्रक्रियाही जाहीर करण्यात आली आहे. गेल्या महिन्यात १ तारखेला सर्वोच्च न्यायालयानं सर्व न्यायाधीशांची मालमत्ता जाहीर करण्याचा निर्णय घेतला होता.

**<><><><><>**

जातनिहाय जनगणनेविषयी सर्व राजकीय पक्षांबरोबर संवाद साधावा, अशी मागणी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याकडे केली आहे. प्रधानमंत्र्यांना त्यांनी तसं पत्र लिहीलं असून त्यात तेलंगण सरकारनं राबवलेल्या जातनिहाय जनगणनेचं प्रारूप केंद्रसरकारनं  पाहावं अशी सूचना केली आहे. आरक्षणावरची ५० टक्क्यांची मर्यादा हटवावी, खासगी शिक्षण संस्थांमधे अनुसूचित जाती, जमाती आणि इतर मागासवर्गियांसाठी आरक्षण ठेवावं असे अनेक मुद्दे खरगे यांनी सुचवले आहेत. दरम्यान खरगे यांच्या पत्रावर भाजपानं टीका केली आहे. जातनिहाय जनगणनेचा निर्णय सरकारने काँग्रेसकडून घेतल्यामुळे त्याचं श्रेय मिळवण्यासाठीची ही धडपड असल्याचा आरोप भाजपा प्रवक्ते गुरुप्रकाश यांनी केला आहे.

**<><><><><>**

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या स्मृतीदिनानिमित्त त्यांना आज अभिवादन करण्यात येत आहे. सामाजिक समता प्रस्थापित करणारे, बहुजनांचे तारणहार असलेले शाहू महाराज यांच्या महान विचार आणि कार्याला शतश: प्रणाम, असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शाहू महाराजांना अभिवादन करताना म्हटलं आहे सामाजिक परिवर्तनाला गती देत समाज विकासात शाहू महाराजाचं योगदान

अमूल्य असल्याचं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शाहू महाराजांना अभिवादन करतांना म्हटलं आहे.

**<><><><><>**

प्रदूषण, हवामान बदल आणि बदलती जीवनशैली यामुळे रुग्ण संख्या वाढत असलेल्या तसंच दीर्घ कालीन आजारांपैकी एक मानल्या जाणाऱ्या अस्थमा म्हणजेच दमा या आजाराबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशानं आज सर्वत्र जागतिक दमा दिवस साजरा केला जात आहे.  दमा हा आजार कोणत्याही वयात होणारा असल्यामुळे या रुग्णांनी आरोग्य राखून आजारावर नियंत्रण कसे ठेवावे, याबाबतही या दिवसाच्या निमित्तानं मार्गदर्शन केलं जात. “श्वासावाटे घेतली जाणारी दम्याची औषधं सर्वांना सहज उपलब्ध करून देणं” ही यावर्षीची संकल्पना आहे.

**<><><><><>**

नवी मुंबईत घणसोली इथल्या गवळीदेव परिसराचा नैसर्गिक पर्यटन स्थळ म्हणून विकास करण्यात येत आहे. महानगरपालिका आयुक्तांनी  आज या विकास कामाची पाहणी केली. डोंगरावर उपलब्ध असलेल्या नैसर्गिक साहित्याचा जास्तीत जास्त वापर करण्याच्या तसंच पर्यटकांना आवश्यक  त्या सर्व पर्यटन सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. या विकास कामासाठी जिल्हा नियोजन समितीच्या पर्यटन विकास योजनेंतर्गत ५ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे.

**<><><><><>**

छत्तीसगढ-तेलंगण सीमेवर केजीएच पर्वतांदरम्यान ४ मे रोजी झालेल्या नक्षलविरोधी कारवईत सागर बोराडे हा सीआरपीएफ जवान गंभीर जखमी झाला. सागर हे सीआरपीएफच्या स्पेशल कोब्रा २०४ बटालियनचं नेतृत्व करत होते. विशेष विमानाने दिल्लीला उपचारांसाठी पाठवण्यात आलं असून सध्या त्यांची प्रकृती स्थिर आहे.

**<><><><><>**

बिहारमध्ये सुरू असलेल्या सातव्या खेलो इंडिया क्रीडा स्पर्धेत जलतरणात आदिती हेगडे हिने सुवर्णपदक पटकावत महाराष्ट्रासाठी पदकांचं खातं उघडलं. जलतरण क्रीडा प्रकारात महाराष्ट्राच्या खेळाडूंनी एक सुवर्ण एक रौप्य आणि पाच कास्य अशी सात पदकं मिळवली. तिरंदाजीत महाराष्ट्राचे सात खेळाडू पदकासाठी लढणार आहेत. मल्लखांबमध्येही सांघिक प्रकारात मुलांनी आघाडी घेतली आहे. खो-खोमध्ये पंजाबचा ५८ विरुद्ध ९ असा पराभव करत महाराष्ट्राच्या मुलींनी विजयी सलामी दिली. या स्पर्धेत कर्नाटक चार सुवर्ण आणि पाच रौप्य पदकांसह पदकतालिकेत पहिल्या, दिल्ली दोन सुवर्णपदकांसह दुसऱ्या आणि राजस्थान तिसऱ्या स्थानावर आहे.

**//<><><><><>//**